प्रेरणादिवसाचे महत्त्व पटवून दिले.

दिव्य मराठी
२२/१०/२०२२

# 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' विषयावर कार्यशाळा

अकोला | हॅपी हवर माध्यमिक विद्यालयात सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स तेजस्विनी राठोड आणि भाग्यश्री दोड यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इंटनेटच्या चुकीच्या वापरामुळे सायबर गुन्हे मोठ्या प्रमाणात वाढत आहेत, याबाबत माहिती सांगितली. मोबाईल फोनचा अती वापर टाळावा, सतत मोबाईल गेम्स खेळल्या मुळे कसे वाईट परिणाम होतात, व्हॉट्सप, इंस्टाग्राम , फेसबुक, ए टी एम, व्हॉईस क्लोनिंग आणि फेक वेबसाइट्सच्या माध्यमातून कशी फसवणूक होते आणि या पासून आपण कसे सुरक्षित राहावे या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून मोबाईलचा योग्य उपयोग करण्यासाठी शपथ दिली. कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे चे प्राचार्य डॉ. जे. एम. साबू, समन्वयक डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली, क्विक हिल फाउंडेशन, महाराष्ट्र सायबर सेल व प्राचार्य अभिलाष बजनोई यांच्या सहकार्याने आयोजित केली होती.